**बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी मान्यता देण्याबाबत...**

प्रियदर्शनी रुरल व ट्रायबल अपलिफ्टमेंट, अकोला संचालित
डॉ. वंदनाताई ढोणे नर्सिंग स्कुल, अकोला

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक एनयुआर-२०१३/प्र.क्र.२२१/१३/शिक्षण-१
९वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- २२ डिसेंबर, २०१५

**वाचा** :

१) शासन निर्णय क्र. एनयुआर २०१४/प्र.क्र.२३४/१४/शिक्षण १, दि. ०३/०३/२०१५

२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्रमांक मआविवि/ पीबी/ युजी/ १०३४/२०१२, दिनांक २७/१२/२०११.

३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. एनयुआर/डॉ.वंदनाताई ढोणे/बीएस्सी व पीबीबीएस्सी(नर्सिंग) प्रस्ताव/खाजगी/ई/१४, दि.१२/८/१४ व १७/११/१५

४) भारतीय परिचर्या परिषदेच्या संकेतस्थळावरील मान्यताप्राप्त संस्थांची यादी

**प्रस्तावना:**

भारतीय परिचर्या परिषदेने सन २०१५-१६ करिता प्रियदर्शनी रुरल व ट्रायबल अपलिफ्टमेंट, अकोला संचालित डॉ. वंदनाताई ढोणे नर्सिंग स्कुल, अकोला या संस्थेस ४० (चाळीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह मान्यता प्रदान केलेली आहे. संदर्भ क्रमांक (१) शासन निर्णय दिनांक ०३/०३/२०१५ मधील परिच्छेद १० अनुसार भारतीय परिचर्या परिषदेची मान्यता असल्यास, राज्य शासनाच्या आवश्यकता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही हे स्पष्ट करण्यात आलेले आहे, त्यानुसार संस्थेस ४० (चाळीस) विद्यार्थी क्षमतेसह **बी.एस्सी. नर्सिंग** अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी संदर्भ क्रमांक (३) अन्वये संस्थेच्या बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता ४० (चाळीस) विद्यार्थी प्रवेशास संचालक वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षम असल्याची शिफारस केलेली आहे. त्यान्वये सदर अभ्यासक्रमास ४० (चाळीस) विद्यार्थी क्षमतेसह शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून प्रवेशास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

भारतीय परिचर्या परिषदेने त्यांच्या दिनांक ०७/१२/२०१५ च्या पत्रान्वये बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची "Cut off date" दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत वाढवून दिली असल्याकारणास्तव संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून ४० (चाळीस) विद्यार्थी प्रवेशित करण्यास प्रियदर्शनी रुरल व ट्रायबल अपलिफ्टमेंट, अकोला संचालित डॉ. वंदनाताई ढोणे नर्सिंग स्कुल, अकोला या महाविद्यालयास ४० (चाळीस) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास दिलेली मान्यता विचारात घेऊन पुढील अटी व शर्थींच्या अधीनतेने याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्थी:**

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्य शासन /केंद्र शासन /मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी **बी.एस्सी.**अभ्यासक्रमासाठी केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिटयुशन प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी ॲक्ट, १९९७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम /कायदा, मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्था त्यांच्या शासकीय वैद्यकीय /दंत/ परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियत वयोमान सेवा निवृत्त अथवा स्वेच्छासेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही, याबाबतचे रू.५०/- च्या स्टँप पेपरवरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी **बी.एस्सी**. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती /अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने शासनास दिले पाहिजे.

९) संस्थेने बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

१०) सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

११) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नयेत.

१२) संस्थेला गुणवत्तेवर आधारीत प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समिती अथवा तत्सम प्राधिकरणाकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

१३) भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची महाविद्यालयास अनुक्रमे मान्यता व संलग्निकरण जोपर्यंत आहे, तोपर्यंत हा शासन निर्णय वैध असेल.

सदर आदेश भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेनुसार आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(पराग वाकडे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव:-

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) सचिव, भारतीय परिचर्या परषिद, कोटला रोड, नवी दिल्ली ११० ००२.
५) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
६) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
७) कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती/ शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
८) प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, इएसआयसी रुग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड, मुंबई ८०.
९) प्राचार्य, डॉ. वंदनाताई ढोणे नर्सिंग स्कुल, अकोला
१०) कक्ष अधिकारी, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय, मुंबई.
११) निवडनस्ती (शिक्षण-१).